# सणासुदींच्या पार्श्वभूमीवर मोटोरोलाकडून जागतिक पातळीवर प्रथमच फ्लिपकार्टसह भारतात स्मार्ट घरगुती उपकरणांची घोषणा

- मोटोरोलाकडून जागतिक पातळीवर प्रथमच शुभारंभ होत असलेल्या स्मार्ट घरगुती उपकरणांच्या श्रेणीत 'खऱ्या अर्थाने स्मार्ट' वॉशिंग मशिन्स, रेफ्रिजरेटर्स आणि एअर-कंडिशनर्सचा समावेश
- भागिदारीमुळे अत्याधुनिक तंत्रज्ञानासह स्मार्ट टीव्हींच्या श्रेणीचा, तसेच अलिकडेच शुभारंभ झालेल्या होम ऑडिओ रेंजचा विस्तार

**बंगळुरू - १७ सप्टेंबर २०२० -** स्मार्ट टीव्ही आणि होम ऑडिओ श्रेणीतील यशस्वी प्रवेशानंतर मोटोरोलाने भारतात स्मार्ट घरगुती उपकरणांच्या क्षेत्रात प्रवेश करून फ्लिपकार्ट या एतद्देशीय ई-कॉमर्स बाजारपेठेसमवेतची आपली भागिदारी अधिक बळकट केली आहे. वॉशिंग मशिन्स, रेफ्रिजरेटर्स आणि एअर कंडिशनर्स यांचा समावेश असलेल्या या उत्पादनांच्या माध्यमातून भारतीय ग्राहकांसाठी मोटोरोलाचे प्रीमिअम ब्रँड आणि फ्लिपकार्टकडे असलेली ग्राहक वर्तणुकीबाबतची समज यांचा भक्कम आधार असलेली 'खऱ्या अर्थाने स्मार्ट, खऱ्या अर्थाने क्रांतिकारी' उत्पादने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

ग्राहकोपयोगी वस्तूंच्या (कन्झ्युमर ड्युरेबल) बाजारपेठेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा सातत्याने स्वीकार होत असून फ्लिपकार्ट आणि मोटोरोला या श्रेणीत मोटोरोला ब्रँडचा पोर्टफोलिओ निर्माण करण्यासाठी गेले वर्षभर काम करत आहेत. ग्राहकांकडून मिळणारा प्रतिसाद आणि त्यांच्या मतांचा विचार करून आपल्या भारतभरातील वाढत्या ग्राहकवर्गासाठी अत्यंत उपयुक्त आणि श्रेणीतील सर्वोत्तम अशी उत्पादने सादर करण्याचा फ्लिपकार्टचा अतिशय समृद्ध असा इतिहास आहे. या दोन कंपन्यांमधील धोरणात्मक भागिदारी ही ग्राहकांच्या सुलभतेसाठी डिझाइन केलेली कल्पक आणि प्रीमिअम उत्पादने सादर करण्याच्या मोटोरोलाच्या तत्त्वांशी सुसंगत आहे.

या घोषणेबाबत **मोटोरोला मोबिलिटीचे कंट्री हेड आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. प्रशांत मणी** म्हणाले, *"कल्पक संशोधनाच्या आपल्या तब्बल १०० वर्षांच्या प्रवासात मोटोरोलाने अनेक पायंडे पाडले असून लोकांचे आयुष्य समृद्ध करणारी कल्पक उत्पादने सादर करण्यावर मोटोरोलाचा विश्वास आहे. हा वारसा पुढे नेत भारतात फ्लिपकार्टच्या समवेत आमच्या स्मार्ट घरगुती उपकरणांचा शुभारंभ करताना आम्ही रोमांचित झालो आहोत. या खऱ्या अर्थाने स्मार्ट आणि क्रांतिकारी रेफ्रिजरेटर्स, वॉशिंग मशिन्स आणि एअर कंडिशनर्सच्या श्रेणीसह भारतीय ग्राहकांसाठी खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवणाऱ्या अनुभवांची श्रेणी सादर करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. हा शुभारंभ म्हणजे फ्लिपकार्टसमवेतची आमची भागिदारी अधिक बळकट होत असल्याचे निदर्शक असून अधिक स्मार्ट आयुष्यासाठी सर्वसमावेशक अशा घरगुती उपकरणांच्या माध्यमातून स्मार्ट फोन्स, स्मार्ट टीव्ही आणि होम ऑडिओच्या आमच्या विद्यमान पोर्टफोलिओला पूरक उत्पादने सादर करण्यासाठी आम्हाला साहयभूत ठरणारे आहे."*

**फ्लिपकार्टच्या प्रायव्हेट ब्रँड्स विभागाचे उपाध्यक्ष देव अय्यर** म्हणाले, *“भारतीय ग्राहकांची नाडी अचूकपणे ओळखणारी आणि सध्याची, तसेच आगामी मागणीचा कल लक्षात घेऊन त्यानुसार उत्पादने सादर करणारी एतद्देशीय कंपनी ही आमची ओळख आमच्यासाठी अभिमानास्पद आहे. ग्राहकांचा स्मार्टर जीवनशैलीकडे कल वाढत असून मोटोरोलाच्या वतीने सादर होत असलेल्या या आगामी सर्वोच्च पातळीवरील स्मार्ट घरगुती उपकरणांमुळे त्यांना त्यांच्या आयुष्यात बदल करणे शक्य होणार आहे. आमच्या ग्राहकांना सर्वोत्तम आणि अद्ययावत उत्पादने उपलब्ध करून देण्यासाठी ही धोरणात्मक भागिदारी असून सणासुदीच्या पार्श्वभूमीवर मोटोरोलाला त्यांची उत्पादने अधिक प्रभावीपणे पोहोचवता यावीत, यासाठी मोटोरोला समवेतच्या या भागिदारीमुळे आम्ही आनंदित आहोत.”*

स्मार्ट घरगुती उपकरणांच्या क्षेत्रात पदार्पण करण्याबरोबरच फ्लिपकार्टच्या सहकार्याने मोटोरोला येत्या उत्सवपर्वाच्या पार्श्वभूमीवर स्मार्ट टीव्ही आणि अलिकडेच सादर करण्यात आलेल्या होम ऑडिओ श्रेणीचा विस्तार करण्यास सज्ज आहे.

वापरण्यातील सुलभता आणि व्यक्तिगत गरजांनुसार वापर याबरोबरच अशा प्रकारच्या स्मार्ट घरगुती उपकरणांमध्ये ग्राहकांचे स्मार्ट फोन्स/रिमोट कंट्रोलवरील केवळ एका बटणाच्या माध्यमातून संपूर्ण घर जिवंत करून आमूलाग्र परिवर्तन घडवण्याची क्षमता आहे. उद्योग क्षेत्राच्या अहवालानुसार सन २०२२ पर्यंत भारतीय स्मार्ट होम बाजारपेठ ६ अब्ज रुपयांपर्यंत पोहोचेल, असा अंदाज असून जागतिक बाजारपेठ ५३.४५ अब्ज डॉलरवर पोहोचण्याचा अंदाज आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर स्मार्ट उपकरणांच्या बाजारपेठेच्या विस्ताराला प्रचंड मोठा वाव आहे.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India’s leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India’s e-commerce revolution. With a registered customer base of over 200 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem, and empower generations of entrepreneurs and MSMEs has driven us to innovate on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, and PhonePe, India’s fastest growing digital payments platform, the Flipkart Group is steering the transformation of commerce in India through technology.

**About Motorola Strategic Brand Partnerships**

For over 90 years the Motorola brand has been known around the world for high quality, innovative and trusted products. Motorola’s Strategic Brand Partnership program seeks to leverage the power of this iconic brand by teaming with dynamic companies who offer unique, high quality products that enrich consumer’s lives. Strategic brand partners work closely with

Motorola engineers while developing and manufacturing their products, ensuring that their products meet the exacting safety, quality, and reliability standards that consumers have come to expect from Motorola. To learn more about Motorola strategic brand partnerships, follow us @ShopMotorola

MOTOROLA, the Stylized Motorola Logo and the Stylized M Logo are trademarks or registered trademarks of Motorola Trademark Holdings, LLC, and are used under license.

**For more details contact: media@flipkart.com**